# —: प्रेस नोट :—

दिनांक ११/०७/२०२५

## पार्कसाईट पोलीस ठाणेकडुन गुजरात राज्यातील सराईत गुन्हेगाराला जबरी चोरीच्या गुन्हयात अटक करून जबरी चोरीतील सर्व मुददेमाल जप्त केले बाबत

पार्कसाईट पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०७/०७/२०२५ रोजी दुपारी १४:२१ वा. सुमारास फिर्यादी यांची पत्नी श्रीमती नुरजहॉ मुनाफ खान वय ५४ वर्ष हया घरामध्ये एकटयाच असतांना कोणीतरी अज्ञात इसमाने घरात प्रवेश करून श्रीमती नुरजहॉ यांचे हाताला व डोक्याला दुखापत करून त्यांचे हातामधील सोन्याचे बांगडया, कानातील कर्णफूले, सोन्याचे गळयातील पेंडंट व गळयातील सोन्याची चैन असे एकुण १,५००००/—रू.अं. किंमतीचा मुददेमाल जबरीने चोरी करून घेउन गेला म्हणून फिर्यादी यांच्या तक्रारीवरून पार्कसाईट पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ५४०/२०२५ कलम ३०९(६),३३३ भा.न्या.सं.अन्वये नोंद करण्यात आला. गुन्हयाचे गांभिर्य पाहुन मा पोलीस उप आयुक्त., परि. ७ यांनी गुन्हयाचे तपासकामी एकुण ०४ पथक गठीत करून तपासाचे निर्देश दिले होते.

सदर गुन्हयाचा तपास सुरू करून सदर गुन्हयाचे घटनास्थळाच्या आजुबाजूचे सी.सी.टी. व्ही तपासुन संशयित आरोपीचा मार्ग शोधण्यात आला. परिसरातील सी.सी.टी.व्ही. मध्ये संशयित आरोपी निश्चित करून त्याचे येण्याजाण्याच्या मार्गावरील जवळ पास २५० सी.सी.टी.व्हीं.ची तपासणी पार्कसाइट पोलीस ठाणेकडील तपास पथकांकडून करण्यात आली. संशयित आरोपी हा घटनास्थळापासून विक्रोळी पुढे दादर व तेथुन बांद्रा टर्मिनस येथे गेला असल्याचे दिसून आले. आरोपीच्या हालचाली वरून तो फिर्यादी यांचा जवळचा / परिचित असावा असा अंदाज होता. घटनास्थळा व्यतिरिक्त इतर ठिकाणी आरोपीचे मिळालेल्या फोटोच्या आधारे फिर्यादी यांचे नातेवाईकांकडे चौकशी केली असता तो त्यांचा नातेवाईकच असल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाले.

त्यावरून संशयित आरोपी नामे तबरेज उर्फ पप्पु बिसमील्लाखान पठान, रा.ठि. ११६४—ई,मदीना अर्पाटमेंट, मगनधोबी वाडी, रामपुरा सुरत जि.सुरत याचे बाबत तांत्रिक तपास करून त्याचा ठाव ठिकाणाबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. लागलीच पार्कसाइट पोलीस ठाणेकडील तपास पथक गुजरात येथे तपासकामी रवाना करण्यात आले होते.

गुन्हयातील संशयित आरोपी तबरेज उर्फ पप्पु बिसमील्लाखान पठान वय ३१ रा.ठि. ११६४—ई,मदीना अर्पाटमेंट,मगनधोबी वाडी,रामपुरा सुरत जि.सुरत याचा गुजरात राज्यात जाउन शोध घेतला असता तो आदुंद्रा गाव ता. कडी जि. मेहसाणा गुजरात येथे मिळून आला. तपास पथकाने त्याचेकडे सखोल विचारपुस करून त्याचा गुन्हयातील सहभाग निष्पन्न करून त्याचेकडून गुन्हयातील जबरीने हिसकावलेला संपुर्ण मुद्देमाल हस्तगत केला आहे. अशा प्रकारे घरामध्ये घुसून जबरी चोरी करणा—या आरोपीतपास २४ तासाच्या आत निष्पन्न करून अटक करण्यात आली आहे.

त्याची सखोल चौकशी केली असता तो गुजरात राज्यातील सराईत गुन्हेगार असुन त्याचेवर गुजरात राज्यातील सुरत सिटी येथे खालील प्रमाणे चोरी, घरफोडीचे गुन्हे दाखल आहेत.

अ) उमरा पोलीस ठाणे,सुरत येथे दाखल गुन्हे :-

१. गु.रं.क्रं १२१४/२०१९ कलम ३७९(अ),(३),११४ भा.द.वि.प्रमाणे
२. गु.रं.क्रं ४३७/२०२२ कलम ४३९,३७९(अ)(३), ११४ भा.द.वि.प्रमाणे
३. गु.रं.क्रं ४४४/२०२२ कलम ४३९,३७९(अ),(३), ११४,४१३ भा.द.वि.प्रमाणे.

ब) लालगेट पोलीस ठाणे, सुरत येथे दाखल गुन्हे :-

१. गु.रं.क्रं ६१/२०२३ कलम ३८०,४५७,४११,११४ भा.द.वि.प्रमाणे
२. गु.रं.क्रं २१/२०२३ कलम ४३९,३८०,४५७, ४११, ११४ भा.द.वि.प्रमाणे

क)खाटोदरा पोलीस ठाणे,सुरत येथे दाखल गुन्हे :-

१. गु.रं.क्रं ३८४/२०२२ कलम ४३९,३७९(अ)(३), ११४ भा.द.वि.प्रमाणे
२. गु.रं.क्रं १५३५/२०१९ कलम ३७९(अ)(३), ११४ भा.द.वि.प्रमाणे

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त बृन्हमुंबई, श्री. देवेन भारती, श्री. सत्यनारायण चौधरी सह पोलीस आयुक्त, का. व सु., श्री. महेश पाटील अप्पर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, मुंबई यांच्या आदेशाने व श्री.राकेश ओला, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - ७ यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीमती प्राची कर्णे सहाय्यक पोलीस आयुक्त, विक्रोळी विभाग, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली व.पो.नि., संतोष घाटेकर पार्कसाईट पोलीस ठाणे, पो.नि. सानप गुन्हे यांच्या अधिनस्त गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी स.पो.नि. प्रकाश बोराडे, स.पो.नि. गोळे, सपोनि झाडे, सपोनि भापकर, आणि पोउनि माळी, पोउनि राजपुत व सफौ/मोमीन, पो.ह.क्र.९८०७२१/ढोले, पो.ह.क्र. ०७०९१५/बोरसे, पोहवा ५२६८/सुतार, पो. ह.क्र. ९९०७२२/फुफाणे, पोहवा/०१७३७ ढोमसे, पो.शि.क्र. ०८०००६/नवले, पो.शि.क्र. ०९३१३७/ कोल्हे, पो.शि.क्र.१११९१३/उंडे, पो.शि.क्र. १४०५३९/ कापसे, पो.शि.क्र. ०९२४०५/सुरवाडे, पो.शि.क्र. १४१३७८/तायडे, पो.शि.क्र.१५०६९५/पगार, तसेच परिमंडळ कार्यालयातील महिला पो.शि.क्र. ०९१२१४/रूपाली हाडवळे यांनी सदरची उत्कृष्ट कामगिरी केलेली आहे.

--------------------०००--------------------